# नियम व अटी

1. श्री सद्गुरू वासुदेवनंत सरस्वती वेद पाठशाळेने श्री सद्गुरू वासुदेवनंत सरस्वती तथा बाबा महाराज सहस्रबुद्धे यांचे जयंती निमित्त वेद आणि स्मार्त (याज्ञिक) या विषयांच्या परीक्षा आयोजित केल्या आहेत.
2. प्रवेशपत्रिका व अभ्यासक्रम यांची प्रत आपणाकडे मार्गदर्शनासाठी पाठवीत आहे.
3. परीक्षेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस सोबतच्या अर्जाप्रमाणे प्रवेशपत्रिका पाठविण्यास सांगावी.
4. विद्यार्थ्यांनी आपले अर्ज मिती आषाढ शुद्ध पौर्णिमा ते श्रावण शुद्ध पौर्णिमा पर्यंत द्यावेत. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
5. परीक्षेची तारीख व वेळ १० दिवस अगोदर कळविली जाईल.
6. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र अर्ज पाठवावा.
7. प्रत्येक अर्जासोबत रु.१००/- अनामत रक्कम भरावी लागेल.
8. विद्यार्थी अनुपस्थित राहिल्यास किंवा परीक्षेचे विषय अपूर्ण असल्यास अनामत रक्कम परत दिली जाणार नाही.
9. परीक्षेबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
10. उत्तीर्ण विद्यार्थ्यास पारितोषिक, प्रमाणपत्र आणि प्रवासखर्च कार्तिक शु.१४ या दिवशी समारंभानंतर दिले जातील. (सरकारी साध्या गाडीचे अथवा रेल्वेच्या द्वितीय वर्गाचे भाडे प्रवासखर्च म्हणून दिला जाईल.) (आपले तिकीट प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे.)
11. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवासखर्च दिला जाणार नाही.
12. परीक्षा सत्र सकाळी ७ ते १२ व दुपारी २ ते ८ या काळात असेल. या वेळेचे अगोदर उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच या वेळेत विद्यार्थ्यांना बाहेर जाता येणार नाही अथवा कोणाला भेटता येणार नाही.
13. बाहेरगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांची फक्त परीक्षेच्या दिवशी सकाळी न्याहारी, दुपारचे व रात्रीचे भोजन अशी व्यवस्था विनामूल्य केली जाईल.
14. विद्यार्थ्यांचे बरोबर पालकांस निवास अथवा भोजनाची व्यवस्था नाही.
15. पाठशाळेतर्फे समूह विद्यार्थी आल्यास त्यांचे बरोबर एक व्यवस्थापक अथवा अध्यापक यांची व्यवस्था अगोदर सूचना देऊन होईल.
16. परीक्षेची तारीख जाहीर झाल्यानंतर आपण किती विद्यार्थी भोजनास उपस्थित राहणार ते ५ दिवस आधी कळवावे.
17. कळविलेले विद्यार्थी भोजनास अनुपस्थित राहिल्यास अनामत रक्कम परत मिळणार नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता-
श्री.वे.मू.मंदार फडके.
श्री सदगुरु बाबा महाराज सहस्रबुद्धे समाधी मंदिर.
९३७ डी, चतु:श्रृंगी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.
मो. ८४४६२२४५७५
मो. ९८२२०६१३५०